तरुण भारत

# राज्यपाल कोश्यारी मंगळवारी कोल्हापूर दौऱ्यावर

**कोल्हापूर :** राज्यपाल भगतसिंह कोश्यारी मंगळवार (दि. ५) रोजी जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यात ते महासैनिक दरबार हॉल येथे आयोजित विश्वात्मक संत साहित्य संमेलनाचे उद्‌घाटन करणार आहेत. त्यानंतर शिवाजी विद्यापीठातील प्रेसिडेंट व चान्सलर अवॉर्ड कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. राज्यपाल कोश्यारी यांचा दौरा कार्यक्रम असा, मंगळवारी सकाळी १०:१५ वाजता कोल्हापूर विमानतळ येथे आगमन. १०:२० वाजता शासकीय विश्रामगृहाकडे प्रयाण. ११ वाजता महासैनिक दरबार हॉल येथे विश्वात्मक संत साहित्य संमेलनाच्या उद्‌घाटन कार्यक्रमास उद्‌घाटक म्हणून उपस्थिती. ११:४५ वाजता शिवाजी विद्यापीठाकडे प्रयाण. दुपारी १२:०० वाजता विद्यापीठ येथे आयोजित प्रेसिडेंट व चान्सलर अवॉर्ड कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती.

तरुण भारत

# विद्यापीठातील राज्यशास्त्र अधिविभागप्रमुखपदी डॉ. पवार



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र अधिविभागप्रमुख म्हणून प्रा. डॉ. प्रकाश रामचंद्र पवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. २०२५ पर्यंत ते अधिविभागप्रमुख म्हणून कामकाज पाहणार आहेत. प्रा. पवार हे गेल्या नऊ वर्षापासून विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागात कार्यरत होते. सध्या ते विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटचे प्रभारी संचालक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी विद्यापीठात कार्यरत होण्यापूर्वी पुण्यातील जिल्हा शिक्षण मंडळाच्या प्रा. आर. एम. महाविद्यालय व अण्णासाहेब मगर महाविद्यालयात अध्यापन केले आहे.